# खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड

## शालेय पोषण आहार योजना पुरविण्याबाबत

## महिला बचत गट / स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था

खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या परिसरातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील इयत्ता पहिली ते आठवी वर्गाकरिता ( अंदाजे विद्यार्थी 6000 ) . केंद्र व राज्य शासनाच्या वतीने चालविण्यात येत असलेला शालेय पोषण आहार योजना व सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकषाप्रमाणे दर्जेदार, पौष्टिक, पूरक व सकस आहार पुरविण्याबाबत व सर्व अटींची पूर्तता करणा-यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. या बाबत सर्व माहिती , अटी व शर्ती खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या कार्यालयाच्या संकेत स्थळावर (www.cbkhadki.org.in ), तसेच ऑनलाइन पध्दतीने भरण्यासाठी https://eprocure.gov.in/ eprocure/app या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सदर अर्जा सोबत , सी.ई.ओ. खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड, पुणे - 3 यांच्या नावे 3000/- रु. चा डिमांड ड्राफ्ट , असणे आवश्यक आहे किंवा इंडियन बँक , खडकी शाखा A/c No. 480286911 , IFSC Code IDIB000K155 येथे RTGS /NEFT ने शुल्क भरु शकता आणि UTR ची पावती अर्जासोबत जोडणे.

सर्व अटींची पूर्तता करणारेच अर्ज फक्त विचारात घेतले जातील. अर्ज दिनांक 22.05.2019 पर्यंत मा. छावणी अधिकारी, खडकी छावणी मंडळ, 17 फिल्ड मार्शल करिअप्पा मार्ग, खडकी , पुणे 3 येथे कार्यालयीन वेळेत संपूर्ण जोडलेल्या कागदपत्रासहित सील बंद पाकिटातून कार्यालयीन अधिक्षकांच्या केबीन जवळ ठेवलेल्या सीलबंद लाकडी पेटीत टाकणे . अधिक माहितीसाठी कार्यालय अधिक्षक यांच्याशी पुढील दूरध्वनी क्रमांक 020-25810661/206 वर संपर्क साधावा. जे अर्जदार ऑनलाइन पध्दतीने अर्ज भरणार आहेत त्यांनी कृपया https://eprocure.gov.in/ या संकेत स्थळावर संबंधीत दस्तावेज अपलोड करणे. अर्जाच्या विहित नमुन्यात सर्व माहिती असणे आवश्यक आहे . ही प्रक्रिया ऑनलाइन किंवा ऑफलाइन या पैकी कोणत्याही एका पध्दतीने करु शकता.

(अमोल जगताप )
मुख्य कार्यकारी अधिकारी
खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड

# खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड

## शालेय पोषण आहार योजना पुरविण्याबाबत

## महिला बचत गट / स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था

## अटी आणि शर्ती

1. आर्थिक वर्ष 2016-17, 2017-18 व 2018-19 मधील सरासरी वार्षिक उलाढालीचे पत्र
2. शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करण्याचा अनुभव
   शालेय पोषक आहार / अंगणवाडी / शाळा महाविद्यालये मधील उपहारगृहे, खाजगी कार्यक्रम इ.
3. संस्थेची कार्यवाही :-
   महिला संस्था / चॅरीटेबल ट्रस्ट / सहकारी संस्था इ.
4. स्वयंपाक गृह
   भाडयाच्या जागेत / स्वत:च्या जागेत / आवश्यक उपकरणे / गोदाम उपलब्धता
5. अन्न शिजविण्याचा परवाना
6. वाहनास FDA अन्नवाहतूकीचा परवाना
7. स्वयंपाकगृहास ISO प्रमाणपत्र आहे का ?
8. सर्व लेखे सनदी लेखामार्फत प्रमाणित केली असल्याचे प्रमाणपत्र
9. शासनाने ठरविल्याप्रमाणे प्रत्येक आठवडयात एकदा नियमित आहाराव्यतिरिक्त एक दिवस पूरक आहार स्वखर्चातून देणे अनिवार्य राहिल.
10. संस्थेची नोंदणी 1 एप्रिल 2016 पूर्वी झालेली असणे आवश्यक आहे.
11. सदरील संस्थेच्या विरुध्द किंवा पदाधिका-यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा नसावा.
12. संबंधीत बचत गट, स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्था खडकी कटक मंडळ / पुणे महानगरपालिका / पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील नोंदणीकृत बचतगट असावा.

---

## अर्जासोबत खालील कागदपत्र जमा करावीत.

1. संस्थेचे पदाधिकारी व संपर्क अधिकारी यांचे नाव, पदनाम, पत्ता दूरध्वनी क्र. इ. तपशील
2. संस्थेच्या उपविधीची प्रत / विधान पत्राची प्रत ( Memorandum of Association ) ची प्रत
3. संस्था नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
4. संस्थेच्या कार्याचा अहवाल
5. संस्थेस शासकीय / निमशासकीय वसतीगृहे/ अंगणवाडया यांना आहार पुरवठा करण्या संदर्भात अनुभव असल्यास त्याबातचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सदर प्रमाणपत्रामध्ये अन्न पुरविल्याच्या कालावधी व अन्नपुरवठेच्या एकूण रक्कमेचा उल्लेख असावा.
6. अग्निसुरक्षतता प्रमाण पत्राची प्रत
7. अन्न सुरक्षा व मानके अधिनियम 2006 नुसार संस्थेचा अन्न शिजविण्याचा परवाना
8. शिजविलेल्या अन्नाची शाळा स्तरांपर्यंत वाहतूक करण्याकरिता स्वत:च्या मालकीची / भाडेतत्वावरील वाहनाचे अन्न सुरक्षा व मानके अधिनियम 2006 नुसार वाहन परवाना, याब ाबतचे स्वयं घोषणा पत्र व संबंधीत वाहनाचे आरसीबुक व अन्न सुरक्षा व मानके अधिनियम 2006 अंतर्गत वाहतुकीचा परवाना व भाडेकरार
9. गुमास्ता अनुज्ञापत्राची प्रत (Shop Act License)

10. कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबतचे व काळया यादीत समावेश नसल्याबाबतचे ( black listed ) 500 रु. च्या स्टॅम्प पेपर वर ॲफिडेव्हिट
11. संस्थेचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले 2016-17, 2017-18 व 2018-19 या वर्षाचे आर्थिक ताळेबंद
12. आहार शिजवून त्याचे वाटप करण्या संदर्भातील आर्थिक उलाढाल ही वर्ष 2016-2017, 2017-18, 2018-19 मध्ये (5000 विदयार्थी ) युनिटसाठी वार्षिक सरासरी 20 लक्ष व किमान व (10,000 विदयार्थी ) 1 युनिटसाठी 40 लक्ष रु. असल्याचे सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र
13. संस्थेकडे स्वयंपाकगृहासाठी तसेच गोडाऊनसाठी महानगरपालिका / नगरपालिका / कटकमंडळ क्षेत्रानुसार आवश्यक असणा-या जागेची कागदपत्रे (जागा स्वत:च्या मालकीची असल्यास ) किंवा नोंदणी कृत भाडेकरार (जागा भाडयाची असल्यास) या बाबतची कागदपत्रे
14. अर्जदाराने सादर केलेली सर्व कागदपत्र नोटरी करुन सादर करावे.
15. शालेय पोषण आहार अंतर्गत आहार पुरवठा करण्या करिता मागविण्यात आलेले अर्ज कुठलेही लेखी किंवा तोंडी कारण न देता स्वीकृत करणे, नाकारणे किंवा रदद् करणे याबाबतचे सर्व अधिकार संस्थेस असेल.

टीप :- अर्ज करण्यापूर्वी सोबत जोडलेले स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest ) सविस्तर वाचून अर्ज करावा.

## ई -निविदा वेळापत्रक

| कार्यवाही | दिनांक |
|---|---|
| Expression of Interest - स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज मागविणे, त्यासाठी जाहिरात देणे | 02.05.2019 |
| **निविदा upload करण्यासाठी मुदत ( कागदपत्रांसह )** | **दिनांक 02.05.2019 वेळ सकाळी 10.00 ते दिनांक 22.05.2019 रात्री 3.00 पर्यंत** |

| | |
|---|---|
| **निविदा उघडण्याचे दिनांक व वेळ** | दिनांक 01.06.2019 वेळ सकाळी 11.00 वाजता |
| पात्र संस्थाकडून पर्याय मागविणे ( 4.11 नुसार ) दोन्ही पर्यायासाठी स्वतंत्रपणे शाळा निश्चिती करणे व संस्थानिहाय शाळा वाटप करणे. पात्र अर्जदारांनी कार्यादेश/ work order देणे. | 03.06.2019 |
| तांत्रिक बाबी पूर्ण करण्यासाठी कालावधी (सुरक्षा अनामत रक्कम भरणे इ. ) अंतिम कागदपत्रे (documentation) सादर करणे व करारनामे करणे. | 15.06.2019 |
| केंद्रीय स्वयंपाकगृहामार्फत आहार पुरवठा सुरु करणे. | सन 2019-20 या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवसापासून ( 17.06.2019) |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | खडकी कटक मंडळ, खडकी |

# खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड

## शालेय पोषण आहार योजना पुरविण्याबाबत

## महिला बचत गट / स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्थाने भरावयाच्या अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव | ------------------------------------------------ |
| २. | संस्थेच्या कार्यालयाचा पूर्ण पत्ता संपर्कासाठी प्रतिनिधीचे नांव व दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक ई-मेल आय डी. | ------------------------------------------------<br>-----------------------------------------------<br>----------------------------------------------- |
| ३. | संस्थेचा नोंदणी प्रकार (सार्वजनिक विश्वस्थ व्सवस्था अधिनियम 1950/संस्था नोंदणी अधिनियम 1860/सहकारी संस्था अधिनियम 1960/ कंपनी नोंदणी कायदा 2011/बचतगट यापैकी एक ) | -----------------------------------------------<br>-----------------------------------------------<br>-----------------------------------------------<br>-----------------------------------------------<br>----------------------------------------------- |
| ४. | संस्था नोंदणी क्रमांक व दिनांक संस्थेच्या कामाचे कार्यक्षेत्र | -----------------------------------------------<br>-----------------------------------------------<br>----------------------------------------------- |
| ५. | i) संस्थेच्या स्वयंपाकगृहाचा संपूर्ण पत्ता<br>ii) स्वयंपाकगृहात कोणकोणती व्यवस्था व यंत्रसामग्री आहे. (तपशील द्यावा.)<br>iii) स्वयंपाकगृह कोणत्या मजल्यावर आहे. | -----------------------------------------------<br>-----------------------------------------------<br>-----------------------------------------------<br>-----------------------------------------------<br>----------------------------------------------- |
| ६. | स्वयंपाकगृहाची जागा मालकीची / भाडयाची आहे. | -----------------------------------------------<br>----------------------------------------------- |
| ७. | i) स्वयंपाकगृह उभारण्यासाठी बँकेकडून कर्ज घेतले आहे | -----------------------------------------------<br>----------------------------------------------- |

| | | |
|---|---|---|
| | काय ?<br>ii) कर्जाची परतफेड / व्याज प्रलंबित आहे काय ? असल्यास तपशील द्यावा. | ---------------------------------------------------<br>--------------------------------------------------- |
| ८. | संस्थेनी शासनाविरुध्द न्यायालयीन याचिका दाखल केली आहे काय ? असल्यास तपशील द्यावा. | ---------------------------------------------------<br>--------------------------------------------------- |
| ९. | स्वयंपाकगृहाचे क्षेत्रफळ (चौरसफुटामध्ये ) | ---------------------------------------------------<br>--------------------------------------------------- |
| १०. | स्वयंपाकगृहाची दिवसाची क्षमता (दररोज जास्तीत जास्त किती मुलांसाठी आहार पुरवठा करु शकतात. ) | ---------------------------------------------------<br>--------------------------------------------------- |
| ११. | संस्थेच्या गोडाऊनचे क्षेत्रफळ (चौरसफुटामध्ये ) | ---------------------------------------------------<br>--------------------------------------------------- |
| १२. | एकूण क्षेत्रफळ ( 10 +12 ) | ---------------------------------------------------<br>--------------------------------------------------- |
| १३. | संस्थेस असलेल्या कामाचा अनुभव (मागील वर्षाचा तपशील द्यावा) | ---------------------------------------------------<br>--------------------------------------------------- |

| अ.क्र. | शासकीय, निमशासकीय संस्था/ खाजगी (वस्तीगृहे<br><br><br><br>, जिमखाना, खाजगी कार्यक्रम इ. आस्थापनेचा प्रकार) | ज्या आस्थापनेकडे अन्न शिजवुन दिले त्या आस्थापनेचे नांव व पत्ता | अन्न शिजवुन देण्याचे काम केल्याचा कालावधी | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| १४. | आर्थिक वर्ष सन 2016-17, 2017-18 व 2018-19 मधील संस्थेची सरासरी उलाढाल (लाखामध्ये) | |
| १५. | अन्न, सुरक्षा व मानके अधिनियम सन 2011 नुसार अन्न शिजविण्याचा परवाना क्र.व दिनांक | ---------------------------------------------------------------<br>--------------------------------------------------------------- |
| १६. | संस्थेकडे अन्न शिजविण्यासाठी आरोग्यदृष्टया पात्र असलेला व संसर्गजन्य रोगापासुन मुक्त असलेला कर्मचारी वर्ग संख्या (काम मिळाल्यास भविष्यात कामावर घेण्यार असल्यास तसा उल्लेख करावा.) | ---------------------------------------------------------------<br>--------------------------------------------------------------- |
| १७. | संस्थेकडे महानगरपालिका /नगरपालिका/ नगरपरिषद /कटकमंडळ यांचे आरोग्य अधिकारी / सक्षम अधिकारी यांचा स्वयंपाक गृहाचा (Kitchen NOC) / अन्न शिजवून तयार करण्याचा परवाना (cooking License) क्रमांक व दिनांक | ---------------------------------------------------------------<br>---------------------------------------------------------------<br>--------------------------------------------------------- |

| | | |
|---|---|---|
| १८. | स्वयंपाकगृहासाठी अग्निसुरक्षा प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | |
| १९. | अन्न भेसळ अधिनियमांतर्गत परवाना क्रमांक व दिनांक | |
| २०. | संस्थेकडे असलेली वाहने त्यांची संख्या व RC Book यांच्या प्रती (अन्न सुरक्षा व मानके अधिनियम 2011 अंतर्गत वाहतुकीच्या परवानासह ) (काम मिळाल्यावर वाहनाची व्यवस्था करणार असल्यास तसा उल्लेख करावा.) | |
| २१. | संस्था काळया यादीत आहे काय ? ( होय / नाही ) नसल्यास 100 रु. च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज प्रतिज्ञापत्र | |
| २२. | संस्था / पदाधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हा नोंद आहे काय ? | |

मी / आम्ही अर्जातील सर्व नियम, अटी व शर्ती हया काळजीपूर्वक वाचल्या असून त्या आम्हाला मान्य आहेत. मी / आम्ही सर्व नियम, अटी व शर्तीची पूर्तता केलेली आहे. वर नमूद केलेली सर्व माहिती खरी व सत्य आहे. काम मिळाल्यास ज्या शाळांचे आहार पुरवठयाचे काम खडकी कटक मंडळा तर्फे देण्यात येईल ते आम्हास विनातक्रार मान्य असेल.

संस्था अध्यक्ष / सचिव स्वाक्षरी

ठिकाण : -

पूर्ण नाव :-

दिनांक :-

पदनाम :-

शिक्का :-

# केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीबाबत स्वारस्याची अभिव्यक्तीचे प्रारुप / नमुना

## (Expression of Interest)

योजनेची माहिती : -

1. केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना राज्यामध्ये दिनांक 22 नोव्हेंबर, 1995 पासून सुरु करण्यात आली आहे.

2. केंद्र व राज्य शासनाच्या ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी संस्थाच्या , अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा, वस्ती शाळा , महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्र या ठिकाणी इयत्ता 1 ली ते 8 वी पर्यंतचे शिक्षण घेणारे विद्यार्थी शालेय पोषण आहार योजनेचे लाभार्थी आहेत.

3. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि. 18 जून, 2009 च्या शासन निर्णयानुसार आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून दि. 03 ऑगस्ट, 2018 रोजी उच्चस्तरीय समितीच्या निर्णयानुसार, राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषद / कटकमंडळ क्षेत्रातील योजनेच्या पात्र शाळांमधील विद्यार्थ्यांना योजनेअंतर्गत शिजविलेल्या गरम आहाराचा (Cooked Food) पुरवठा करण्यासाठी बचत गट / स्वयंसेवी संस्था / अशासकीय संस्थाकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

4. कामाचे स्वरुप :-

4.1 शालेय पोषण आहार या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत इ. 1 ली ते इ.5 वी या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना 450 उष्मांक व 12 ग्रॅम प्रथिनेयुक्त मध्यान्ह भोजन आणि इ. 6 वी ते इ. 8 वी या उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांना 700 उष्मांक व 20 ग्रॅम प्रथिनेयुक्त मध्यान्ह भोजन पुरविण्यात येते. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रति दिन 100 ग्रॅम तांदूळ आणि उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रति दिन 150 ग्रॅम तांदूळ मोफत देण्यात येतो. या तांदुळाशिवाय शासनाने विहित केलेल्या प्रमाणानुसार संबंधीत संस्थेने स्वखर्चाने खरेदी करुन अथवा पुरवठेदारामार्फत पुरविण्यात येणारा इतर आवश्यक धान्यादी माल, भाजीपाला इ. घटकांचा आहारात समावेश करुन विद्यार्थ्यांना शिजविलेले अन्न पुरवायचे आहे. शिजविलेल्या अन्नाचे सर्वसाधारणपणे वजन प्रति विद्यार्थी प्राथमिक करिता 400 ते 450 ग्रॅम व उच्च प्राथमिक करिता 700 ते 750 ग्रॅम असणे आवश्यक आहे. संबंधित संस्थेस तांदुळाचा पुरवठा शासन स्तरावरुन करण्यात येईल.

4.2 नागरी भागाकरिता स्वारस्याच्या अभिव्यक्ती (Expression of Interest) अर्ज प्रक्रियेतून पात्र ठरणा-या व सर्वात जास्त गुण मिळालेल्या संस्थांना आहार वाटपाचे काम हे पारदर्शक पध्दतीने संस्थेच्या क्षमतेनुसार विभागून वाटप करण्यात येईल.

4.3 नागरी भागामध्ये तयार आहार पुरवठा करणा-या संस्थेने स्वखर्चाने खाली नमूद अन्न शिजविण्याकरिता वापरावयाच्या धान्यादी वस्तू व त्याचे प्रति दिन प्रति विद्यार्थी प्रमाण याबाबतच्या तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वस्तूचे नाव | प्राथमिक ( ग्रॅम मध्ये ) | उच्च प्राथमिक (ग्रॅम मध्ये ) |
|---|---|---|---|
| १. | मूग डाळ | 20.00 | 30.00 |
| २. | मसुर डाळ | 20.00 | 30.00 |
| ३. | तुर डाळ | 20.00 | 30.00 |
| 4. | हरभरा | 20.00 | 30.00 |
| 5. | चवळी | 20.00 | 30.00 |
| 6. | मटकी | 20.00 | 30.00 |
| 7. | मूग | 20.00 | 30.00 |
| 8. | वाटाणा | 20.00 | 30.00 |
| 9. | फोर्टीफाइड ईडीबल सोयाबीन तेल (प्रति लिटर ) | 5.00 | 7.5 |
| 10. | कांदा लसूण मसाला | 0.30 | 0.45 |
| 11. | हळद पावडर ( ॲग्मार्क ) | 0.15 | 0.20 |
| 12. | डबल फोर्टीफाइड मीठ ( ॲग्मार्क ) | 2.00 | 3.00 |
| 13. | जिरे | 0.10 | 0.15 |
| 14. | मोहरी | 0.15 | 0.20 |
| 15. | मिरची पावडर ( ॲग्मार्क ) | 0.30 | 0.45 |
| 16. | गरम मसाला ( ॲग्मार्क ) | 0.10 | 0.10 |
| 17. | भाजीपाला | 50 | 75 |

4.4 शासन निर्णय दिनांक 18 जून 2009 व दिनांक 02 फेब्रुवारी , 2011 मधील परिशिष्टात विहित करण्यात आलेल्या पाककृतीप्रमाणे तसेच , खाली नमूद केलेल्या पाककृतीपैकी आठवडया मध्ये विविध पाककृतींचा समावेश असलेला दररोज शिजविलेला ताजा व गरम आहाराचा पुरवठा संस्थेने संबंधित शाळांना करावयाचा आहे. या योजनेमध्ये लाभार्थ्यांना द्यावयाच्या पाककृती शासनामार्फत आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या आहेत. सदर पाककृतीमणून दिवसनिहाय पाककृती निवड करण्याचे

व त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संथांना राहतील. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | पाककृती |
|---|---|
| 1 | डाळ तांदुळाची खिचडी (मूग डाळ ) |
| 2 | भात व कडधान्याची उसळ (मटकी ) |
| 3 | भात व कडधान्याची उसळ (वाटाणा ) |
| 4 | वरण भात (तूर डाळ ) |
| 5 | भात व कडधान्याची उसळ (हरभरा ) |
| 6 | भात व कडधान्याची उसळ (चवळी ) |
| 7 | पुलाव भात |

तसेच, आठवडयातून एकदा नियमित आहाराव्यतिरिक्त एक दिवस पूरक आहार दि. 2 फेब्रुवारी , 2011 च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या पदार्थापैकी (खजूर, चिक्की, राजगीरा लाडू ,फळे इ. ) स्वखर्चातून देणे अनिवार्य राहील.

प्रत्येक आठवडयाचा पूरक आहार प्रत्येक बुधवारी खालील नियोजनाप्रमाणे द्यावा-

1. महिन्याचा पहिला बुधवार - फळे स्थानिक उपलब्धतेनुसार
2. महिन्याचा दुसरा बुधवार - शेंगदाणा लाडू / चिक्की
3. महिन्याचा तिसरा बुधवार - राजगिरा / चुरमुरा लाडू
4. महिन्याचा चौथा बुधवार - खजूर /खारीक
5. महिन्याचा पाचवा बुधवार - फळे स्थानिक उपलब्धतेनुसार

जर बुधवारी शाळेला सुटी असेल तर लगतच्या शालेय दिवशी पूरक आहाराचे वाटप करण्यात यावे.

4.5 संबंधित संस्थेने अन्न शिजविताना आवश्यक असलेलर भाजीपाला, कोथिंबीर , मिर्ची,टोमॅटो व इतर साहित्याचा स्वखर्चाने वापर करणे अनिवार्य राहील. अन्न शिजविण्याकरिता आवश्यक इंधन स्वखर्चाने वापरणे अनिवार्य राहील.

4.6 शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून मिळणारा तांदूळ हा अन्न शिजवून देणा-या संस्थांना स्वतंत्र पुरवठेदारा मार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल. उपलब्ध करुन देण्यात आलेला तांदूळ सुस्थितीमध्ये ठेवण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

4.7 संस्थेने स्वत:च्या स्वयंपाकगृहामध्ये अन्न शिजवायचे आहे. शिजवलेले अन्न शाळांस्तरापर्यंत वाहतूक करुन शाळेमध्ये विद्यार्थ्यांना रांगेमध्ये बसवून वाटप करावयाचे आहे. विद्यार्थ्यांनी आहार घेतल्यानंतर त्यांच्या जेवणाची ताटे व इतर भांडी स्वच्छ करणे व परिसर स्वच्छ करणे आदी कामे

संबंधित संस्थेस करणे अनिवार्य राहील. तयार अन्नाचा पुरवठा शाळांपर्यंत करणे, विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप करणे, भांडी व परिसर स्वच्छ करणे ही सर्व जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. शाळा, शिक्षक व विद्यार्थी यांच्यावर याबाबतची कोणतीही जबाबदारारी राहणार नाही.

4.8 शिजविलेले अन्न हवाबंद डब्यातून आणि अन्न व औषध प्रशासनाचा अन्न वाहतूकीचा परवाना असलेल्या वाहनातून अन्नाची वाहतूक शाळास्तरापर्यंत करण अनिवार्य राहील.

4.9 संस्थेस आहार पुरवठयाच्या कामाचे कंत्राट दिल्याच्या दिनांकापासून पुढील 3 वर्षाच्या कालावधीत शालेय कामकाज सुरु असणा-या प्रत्येक शालेय दिवशी दैनंदिन तत्वावर संस्थेने शिजविलेल्या आहाराचा पुरवठा शाळेतील विद्यार्थ्यांना करावयाचा आहे.

4.10 शिजविलेल्या आहाराचा पुरवठा शाळेत पहिली ते आठवीच्या वर्गात उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक / विभाग प्रमुख ठरवतील त्यावेळेत करावयाचा आहे. ज्या शाळेमध्ये दोन सत्रामध्ये वर्ग चालविले जात असतील अशा शाळेमध्ये पहिल्या व दुस-या सत्रामध्ये वर्ग चालविले जात असतील अशा शाळेमध्ये पहिल्या व दुस-या सत्रासाठी वेगवेगळया पाककृती देणे आवश्यक राहील. सकाळच्या सत्रासाठी सकाळी तयार केलेला आहार आणि दुपारच्या सत्रासाठी दुपारी तयार केलेला आहार असणे आवश्यक आहे. शाळेचे मुख्याध्यापक / विभाग प्रमुख प्रत्येक महिन्याकरिता पटसंख्या व अपेक्षित सरासरी उपस्थिती निश्चित करुन ती माहिती संस्थेस लेखी देतील.

4.11 स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रियेद्वारे नियुक्त होणा-या संस्थेने प्रति विद्यार्थी प्रति दिन प्राथमिकसाठी 400 ते 450 ग्रॅम वजन ाचा व उच्च प्राथमिकसाठी 700 ते 750 ग्रॅम वजनाचा तयार आहार पुरवठा करणे बंधनकारक राहील. सदर आहार संबंधित संस्थेने MDM PORTAL वरील मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येवरुन तयार करणे आवश्यक आहे. आहार तयार करण्यासाठी आवश्यक असणारा इतर धान्यादी माल खरेदीबाबत संबंधित संस्थांना खालीलप्रमाणे दोन पर्याय देण्यात येतील.

पर्याय 1 - ज्या संस्थांना स्वखर्चाने धान्यादी माल (उदा. कडधान्य, तेल, मसाला ) खरेदी करुन शाळांना विद्यार्थी संख्येनुसार शिजविलेल्या अन्नाचा पुरवठा करावयाचा आहे. अशा संस्थाकडून प्राप्त होणा-या आहाराचे नियमितपणे प्रति दिन आहार पुरवठा करते वेळी वजन केले जाईल आणि प्रत्यक्षात वजन ( डब्याचे वजन वगळून) त्याला 400 ग्रॅम (प्राथमिकसाठी ) / 700 ग्रॅम ( उच्च प्राथमिकसाठी ) याच्याशी भागून प्रत्यक्षात किती विद्यार्थ्यासाठी संस्थेकडून आहार आला आहे, याची परिगणना केली जाईल. अशी परिगणना करुन ज्या शाळेमध्ये फक्त प्राथमिक (इ.1 ली ते 5 वी ) विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तेथे शिजविलेल्या आहारासाठी रु. 10.90 प्रति किलो व ज्या शाळे मध्ये केवळ उच्च प्राथमिक (इ.6वी ते 8 वी ) शिक्षण घेत आहेत अशा शाळांसाठी रु. 9.30 प्रति किलो याप्रमाणे रक्कम देय राहील. ज्या शाळांमध्ये प्राथमिक व उच्च प्राथमिक असे दोनही प्रकारचे वर्ग सुरु आहेत अशा शाळांसाठी शिजविलेल्या आहारासाठी रु. 10.10 प्रति किलो याप्रमाणे देयके अदा केले जातील.

पर्याय 2 - स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रियेद्वारे पात्र संस्थांना पुरवठेदाराकडून धान्यादी माल पुरविण्यात येईल. सदर धान्यादी मालाचा वापर करुन अन्न शिजवून देण्यास संस्था इच्छुक

असल्यास अशा संस्थाना प्रस्तुत पुरवठेदारामार्फत धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येईल. सदर धान्यादी मालाचा वापर करुन संस्थांनी प्राथमिक वर्गासाठी 50 ग्रॅम पति विद्यार्थी व उच्च प्राथमिक वर्गासाठी 75 ग्रॅम प्रति विद्यार्थी याप्रमाणात भाजीपालाचा वापर करुन अन्न शिजवून देणे आवश्यक राहील. यासाठी संबंधित संस्थेस इंधन व भाजीपाला खर्चापोटी प्राथमिक वर्गासाठी प्रति दिन प्रति विद्यार्थी रु. 1.57 व उच्च प्राथमिक वर्गासाठी प्रति दिन प्रति विद्यार्थी रु. 2.35 याप्रमाणे देयकाची अदायगी करण्यात येईल.

4.12 संस्थेची निवड झाल्यानंतर उपरोक्त दोन पर्यायापैकी एक पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य संबंधित संस्थेस राहील. त्याप्रमाणे माहिती महानगरपालिका / नगरपालिका यांनी संबंधित जिल्हयातील शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) यांना देणे आवश्यक राहील. स्विकृत केलेल्या पर्यायानुसार संबंधित संस्थेस देयकाची अदायगी करण्यात येईल. पुरवठा केलेया आहाराची रक्कम शाळेच्या व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यावर जमा करण्यात येईल. शाळा व्यवस्थापन समिती मार्फत संबंधित संस्थेस महिन्यातून किमान एक वेळा देयक अदा करण्यात येईल. शाळा व्यवस्थापन समितीने शासनाकडून देयकापोटी निधी प्राप्त झाल्यानंतर पुढील 10 दिवसात संबंधित संस्थेस देयकाची रक्कम अदा करणे बंधनकारक राहील. शालेय व्यवस्थापन समितीमार्फत अन्नाचा पुरवठा करणा-या संस्थेला विहित कालवधीत देयके अदा होत नसतील तर संबंधित शालेय व्यवस्थापन समितीवर कारवाई करण्याचे व देयकाची अदायगी विहित कालावधीत होण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याचे अधिकार संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांना राहतील.

5. संस्थेच्या पात्रतेबाबतचे निकष :-

5.1 केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीची अंमलबजावणी एखाद्या सेवाभावी अशासकीय संस्थेमार्फत करण्याचा ठराव महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने घेतल्यास त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याचे अधिकार संबंधित महानगरपालिकेकडे राहतील.

5.2 सद्यस्थितीत एखाद्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव करुन शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत आहार वाटपाचे काम एखाद्या सेवाभावी अशासकीय संस्थेस दिले असल्यास सदर संस्थेसोबतचा करारनामा संपुष्टात आल्यानंतर स्वारस्याची अभिव्यक्ती प्रणालीद्वारे अर्ज मागवून संस्था निश्चिती करण्याबाबतची कार्यवाही संबंधित महानगरपालिकेने करावी.

5.3 ज्या स्वयंसेवी संस्थेमार्फत धर्म, जात आणि वंश या आधारे कोणताही भेदभाव करण्यात येत नाही किंवा कोणत्याही विशिष्ट धर्माचा प्रचार करण्यात येत नाही, अशी स्वयंसेवी / अशासकीय संस्था योजनेमध्ये भाग घेण्यास पात्र राहील.

5.4 सदरहू योजनेत भाग घेणारी ही सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 किंवा संस्था नोंदणी अधिनियम 1860 , सहकारी संस्था अधिनियम 1960, कंपनी नोंदणी कायदा, अन्वये ना नफा ना तोटा या तत्वावर नोंदणी झालेली कंपनी अथवा आस्थापना किंवा बचतगट या संस्था

कोणत्याही अधिनियमाखाली नोंदणीकृत झालेल्या असावीत. सदर संस्थेची नोंदणी ही दि.1 एप्रिल 2016 पूर्वी झालेली असणे आवश्यक आहे.

5.5 महानगरपालिका क्षेत्रामध्ये संस्थेस किमान 10000 विद्यार्थ्यांना आहर पुरविण्यासाठी एक युनिट व नगरपालिका / नगरपरिषद यांना किमान 5000 विद्यार्थ्यांना आहार पुरविण्यासाठी एक युनिट याप्रमाणे अर्ज सादर करणे आवश्यक राहील, तथापि विद्यार्थी संख्येनुसार युनिट ठरविताना यामध्ये स्थानिक गरजा विचारात घेऊन बदल करण्याचे अधिकार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विभाग प्रमुखास राहतील.

5.6 आहार पुरविण्यासाठी संस्था आर्थिकदृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. महानगरपालिका क्षेत्रामध्ये किमान 10000 विद्यार्थ्यांच्या 1 युनिटसाठी अर्ज करणा-या संस्थेची आर्थिक उलाढाल सन 2016-17 , 2017-18 व 2018-19 मध्ये वार्षिक सरासरी रु. 40 लक्ष एवढी असणे आवश्यक राहील. कटक मंडळ क्षेत्रातील किमान 5000 विद्यार्थ्यांच्या 1 युनिटसाठी अर्ज करणा-या संस्थेची आर्थिक उलाढाल सन 2016-17, 2017-18 व 2018-19 मध्ये वार्षिक सरासरी रु. 20 लक्ष एवढी असणे आवश्यक राहील. सदर आर्थिक उलाढाल ही आहार शिजवून त्याचे वाटप करण्यासंदर्भातील असणे आवश्यक आहे.

5.7 संस्थेस शासकीय, निमशासकीय संस्थेस किंवा खाजगी उदा. वसतीगृहे, जिमखाना, खाजगी कार्यक्रम इ. ठिकाणी अन्न शिजवून पुरवठा केल्याबाबत कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

5.8 संस्थेकडे स्वयंपाकगृहासाठी तसेच गोडाऊनसाठी महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषद / कटकमंडळ क्षेत्रानुसार खालीलप्रमाणे जागा असणे आवश्यक आहे. सदर जागा संस्थेच्या मालकीची किंवा रितसर नोंदणीकृत भाडेतत्वावर घेतलेली असणे आवश्यक आहे. भाडेकरार स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज करण्यापूर्वीचा असावा. सदरील जागा संबंधित महानगरपालिका/ नगरपालिका कार्यक्षेत्राच्या हद्दीमध्ये असणे आवश्यक आहे.

| नागरी क्षेत्र प्रकार मनपा/ नपा | स्वयंपाक गृहासाठी किमान जागा (carpet area) चौरस फूट | गोडाऊनसाठी किमान जागा (carpet area) चौरस फूट |
|---|---|---|
| महानगरपालिका | 1000 | 1000 |
| बृहन्मुंबई महानगरपालिका | 500 | 500 |
| नगरपालिका/ नगरपरिषद/ कटक मंडळे | 500 | 500 |

तथापि, विद्यार्थी संख्येनुसार प्रति युनिट मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेने बदल केल्यास त्याप्रमाणात स्वयंपाकगृह व गोडाऊनसाठीच्या आवश्यक जागेबाबत बदल करता येईल.

5.9 अन्न सुरक्षा व मानके अधिनियम 2006 नुसार संस्थेकडे अन्न शिजविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे.

5.10 संस्थेकडे अन्न शिज्विण्याच्या प्रक्रियेसाठी आरोग्यदृष्टया पात्र असलेला व कोणत्याही संसर्गजन्य रोगापासून मुक्त असलेला पुरेसा कर्मचारी वर्ग असणे बंधनकारक आहे. शासकीय वैद्यकीय अधिका-याकडून प्रत्येक कर्मचा-याची आरोग्य तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. सदर कार्यवाही संस्थेची निवड झाल्यानंतर 1 महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात यावी.

5.11 शिजविलेल्या अन्नाची शाळास्तरापर्यंत वाहतूक करण्याकरिता स्वत:च्या मालकीची अथवा भाडेतत्वावरील प्रतियुनिट किमान 01 वाहन असणे आवश्यक आहे. सदरील वाहनांना अन्न सुरक्षा व मानके अधिनियम 2006 नुसार वाहन परवाना असणे आवश्यक आहे. याबाबतचे स्वयंघोषणा पत्र व संबंधित वाहनांचे आर.सी.बुक आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियम 2006 अंतर्गत वाहतुकीचा परवाना संबंधित महानगरपालिका / नगरपालिका यांच्याकडे छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तयार आहाराचा पुरवठा अन्न तयार झाल्यापासून जास्तीत जास्त 2 तासामध्ये शाळेपर्यंत पोहचणे आवश्यक राहील.

5.12 स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रियेसाठी संबंधित महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषद / कटकमंडळे क्षेत्रातील नोंदणीकृत बचतगट अर्ज करण्यास पात्र राहतील.

5.13 एक व्यक्ती अनेक संस्थामध्ये पदाधिकारी असल्यास, अशा प्रकरणी कोणत्याही एकाच संस्थेने अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. सदर अटीचे पालन न करणा-या संस्था निवड करण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

5.14 सदरील संस्थेच्याविरुध्द किंवा संस्थेतील पदाधिका-याविरुध्द कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. तसेच, सदरील संस्थेचा काळया यादीत ( Black Listed ) समावेश झालेला नसावा.

5.15 स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रियेतून संबंधित नागरी भागात पात्र ठरलेल्या सर्व संस्थांना आहार वाटपाचे काम मिळण्याच्या दृष्टीने सदर काम विदयार्थी / शाळा संख्येनुसार पारदर्शक पध्दतीने विभागून देण्यात येईल.

6. अर्जासोबत सादर करावयाच्या कागपत्राची यादी :-

6.1 संस्थेने पदाधिकारी व संपर्क अधिकारी यांचे नाव, पदनाम, पत्ता, दूरध्वनी क्रमांक इ.बाबतचा तपशील.

6.2 संस्थेच्या उपविधीची प्रत /विधान पत्राची (Memorandum of Association) ची प्रत

6.3 संस्था नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

6.4 संस्थेच्या कार्याचा अहवाल

6.5 संस्थेस शासकीय / निमशासकीय कार्यालये, वसतीगृहे किंवा अंगणवाडया यांना आहार पुरवठा करण्यासंदर्भात अनुभव असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सदर

प्रमाणपत्रामध्ये अन्न पुरविल्याच्या कालावधी व अन्न पुरवठयाचा एकूण रकमेचा उल्लेख असावा.

6.6 अग्नि सुरक्षितता प्रमाणपत्राची ( Fire Safety Certificate) प्रत

6.7 अग्नि सुरक्षा व मानके अधिनियम 2006 नुसार संस्थेचा अन्न शिजविण्याचा परवाना

6.8 शिजविलेल्या अन्नाची शाळास्तरापर्यंत वाहतूक करण्याकरिता स्वत:च्या मालकीची अथवा भाडेतत्वावरील प्रतियुनिट किमान 01 वाहने असणे आवश्यक आहे. याबाबतचे स्वयंघोषणा पत्र व संबंधित वाहनांचे आर.सी.बुक व अन्न सुरक्षा व मानके अधिनियम 2006 नुसार वाहन परवाना असणे आवश्यक आहे. याबाबतचे स्वयंघोषणा पत्र व संबंधित वाहनांचे आर.सी.बुक व अन्न सुरक्षा व मानके अधिनियम 2006 अंतर्गत वाहतूकीचा परवाना व भाडेकरार.

6.9 गुमास्ता अनुज्ञापत्राची प्रत ( Shop Act License)

6.10 कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबातचे व काळया यादीत समावेश नसल्याबाबतचे (Black Listed) 100 रु. च्या स्टॅम्प पेपरवर ॲफिडेव्हिट

6.11 संस्थेचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले सन 2016-17 व 2017-18 व 2018-19 या वर्षाचे आर्थिक ताळेबंद.

6.12 संस्थेकडे स्वयंपाकगृहासाठी तसेच गोडाऊनसाठी महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषद / कटकमंडळ क्षेत्रानुसार आवश्यक असणा-या जागेची कागदपत्रे (जागा स्वत:च्या मालकीची असल्यास) किंवा नोंदणीकृत भाडेकरार (जागा भाडयाची असल्यास ) या बाबतची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

6.13 उपरोक्त मुद्दा क्रमांक 5.6 नुसार आर्थिक उलाढालीबाबत सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र.

7. संस्थेची निवड करण्याची कार्यपध्दती : -

7.1 मुदद् ा क्रमांक 5 मध्ये नमूद असलेल्या निकषानुसार पात्र असलेल्या संस्थांनी मुदद् ा क्र. 6 मध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची विहित कालावधीत छाननी करण्यात येईल, तसेच त्यांचे गुणांकन करण्यात येईल.

7.2 पात्र झालेल्या संस्थामधून संबंधित महानगरपालिका / नगरपालिका / नगर पंचायत / कटकमंडळ कार्यक्षेत्रामधील केंद्रीय स्वयंपाकगृहाच्या निश्चित झालेल्या युनीट संख्ये इतक्या प्रमाणात सर्वाधिक गुणानुक्रमानुसार संस्थांची निवड करण्यात यावी. निवड झालेल्या संस्थांना आहार वाटपाचे काम विद्यार्थी / शाळा संख्येनुसार पारदर्शक पध्दतीने विभागून देण्यात यावे.

8. सर्वसाधारण अटी व शर्ती :-

8.1 सदर संस्थेने शिजविलेल्या आहाराचा पुरवठा करण्यासंदर्भात द्यावयाची वार्षिक पुरवठयाच्या 3% सुरक्षा अनामत रक्कम या व्यतिरिक्त शासनाच्या तांदुळासाठी स्वतंत्र व सुरक्षा अनामत रक्कत सादर करणे आवश्यक आहे.(मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नावे ) तांदळासाठीची सुरक्षा अनामत रक्कम महानगरपालिका क्षेत्रासाठी रु. 10.00 लक्ष महानगरपालिका /

नगरपालिका / नगरपरिषद / कटकमंडळ क्षेत्रासाठी रु. 5.00 लक्ष प्रति युनिट याप्रमाणे राष्ट्रीयकृत / शेडयूल्ड बँक यांचेकडून काढण्यात आलेल्या Rajya Samanvay Adhikari, Shaley Poshan Aahar Kaksh , Maharashtra Rajya , Pune यांच्या नावे असलेल्या धनाकर्षाद्वारे (Dem and Draft ) भरण्यात यावी. सदर जमा रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

8.2 शालेय पोषण आहार योजनेसाठी केंद्र शासनाकडून मिळणारा मोफत तांदूळ स्वतंत्रपणे नियुक्त केलेल्या कंत्राटदारामार्फत संस्थेस उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर तांदळाची संस्थेने स्वत:च्या गोदामात आवश्यक सर्व उपाययोजना करुन सुस्थितीत साठवणूक करणे आवश्यक राहील.

8.3 पुरवठादार संस्थेस तांदूळाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या वस्तू, भांडी किंवा पूरक पदार्थ शासनाकडून पुरविले जाणार नाही.

8.4 पुरवठादार संस्थेने आहाराची वाहतूक करणा-या वाहनात प्रमाणित इलेक्ट्रॉनिक वजन काटा ठेवला पाहिजे व प्रत्यक्ष आहार शाळेचे कर्मचारी वर्ग यांचेसमोर दररोज वजन करुन दिला पाहिजे.

8.5 नियोजित पुरवठादार संस्थेस नेमून दिलेल्या शाळांमध्ये, आहार पुरवठयाचे काम करणा-या कर्मचा-याकडे अधिकृत ओळखपत्र असणे आवश्यक आहे. सदर कर्मचा-याची माहिती पुरवठादार संस्थेचे महानगरपालिका / नगरपालिका / नगरपरिषद / कटकमंडळ येथील शिक्षण विभागाचे अधिकारी यांचेकडे देणे बंधनकारक राहील.

8.6 शालेय पोषण आहार योजनेसंदर्भात केंद्र शासन व राज्य शासनाच्या आदेशांची / नियमांची अंमलबजावणी पुरवठादार संस्थेने करणे अनिवार्य राहील.

8.7 पुरवठादार संस्थेचे स्वयंपाकगृह, गोदाम, संस्थेतील सर्व लेखी नोंदवहया तसेच अशा वाहनाची शासकीय अधिकारी तपासणी करतील, त्यावेळी संबंधित अधिका-यांना संपूर्ण सहकार्य करण्याची संस्थेची जबाबदारी राहील.

8.8 शाळेमध्ये शिजविलेले अन्न पोहोच करणे तसेच सदर अन्नाचे विद्यार्थ्यांना वाटप करणे त्याप्रमाणे दि. 02.02.2011 च्या शासन निर्णयामध्ये स्वयंपाकी तथा मदतनिसाच्या कामासाठी विहित केलेल्या जबाबदा-या संस्थेच्या राहतील.

8.9 स्वारस्याची अभिव्यक्तीसाठी संस्थेने करावयाच्या अर्जाची किंमत महानगरपालिका करिता रु. 10,000 /- तर नगरपालिका / नगरपरिषद / कटकमंडळ करिता रु. 3000/- इतकी राहील.

8.10 अर्जदार संस्थेने सादर केलेल्या सर्व कागदपत्रातील प्रत्येक कागदपत्र नोटरी करुन सादर करणे अनिवार्य राहील.

8.11 शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत आहार पुरवठा करण्यासाठी मागविण्यात आलेले अर्ज कुठलेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे किंवा रद्‌द करणे याबाबत सर्व अधिकार संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस राहतील.

8.12 शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत शिजविलेला आहार पुरवठा करण्या संदर्भात संस्थेबरोबर करावयाचा करारनामा /Memorandum of Understanding हा 3 वर्षासाठी करण्यात येईल.

8.13 संस्थेस नेमून देण्यात येणारी शाळा व विद्यार्थी संख्या यामध्ये बदल करण्याचा अधिकार संबंधित महानगरपालिका / नगरपालिका यांना राहील.

8.14 किमान दोन महिन्यामध्ये एकदा कच्चा माल व तयार आहाराची तपासणी करण्यासाठी आहाराचे नमुने नियुक्त करण्यात येणा-या संस्थेच्या खर्चाने शासकीय प्रयोगशाळेमध्ये अथवा शासनमान्य खाजगी प्रयोगशाळेमध्ये पृथ:करणासाठी पाठविण्यात येईल. कच्चा माल व तयार आहाराचा नमुना ज्या दिवशी ज्या संस्था / शाळांमधून उचलावयाचा आहे त्यांची निवड संबंधित जिल्हयातील शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी करावी. तसेच, नमुन्यांची संख्या देखील शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी निश्चित करावी.

8.15 आहाराचा पुरवठा करताना संस्थेस कोणतेही कर दयावे लागल्यास त्याचा भरणा संस्थेने स्वत: करणे आवश्यक राहील . तसेच तयार आहाराच्या वाहतूकीच्या दरम्यान अपघात झाल्यास अपघातग्रस्तास भरपाई देण्याची जबाबादारी संस्थेवर राहील.

8.16 संस्था त्यांनी केलेल्या आहार पुरवठयाच्या कामाचे मासिक शाळानिहाय अहवाल (वजनासह) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद / नगरपालिका / नगरपरिषद / कटकमंडळ यांना वेळोवेळी सादर करील. संस्थेने केलेल्या आहार पुरवठयाचे देयक वेळोवेळी शासनाकडून प्राप्त होणा-या निधी नुसार राज्यस्तरावरुन थेटपणे शाळा व्यवस्थापन समितीच्या बँक खात्यामध्ये जमा करुन शाळांमार्फत अदा केले जाईल काही तांत्रिक अडचणी व अपरिहार्य कारणांमुळे देयकाच्या अदायगीस विलंब झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही. ही अट अर्ज सादर करताना संस्थे मान्य करणे आवश्यक आहे.

8.17 आहार पुरवठयाचे काम पुरवठादार संस्थेस स्वत: करावे लागेल. त्याकरिता उपकंत्राटदार नेमता येणार नाही. संस्था त्यांना नेमून दिलेले काम उपपुरवठादार नेमून करत असल्याचे आढळून आल्यास संस्थेस देण्यात आलेला कामाचा ठेका रदद्‌ करण्यात येईल .

8.18 आहार शिजविण्यासाठी हळद, मिरची पावडर, कांदा लसूण मसाला व गरम मसाला हया ब्रँडेंड व ॲगमार्क असलेल्या वापरणे अनिवार्य राहील. तसेच , फोर्टिफाईड सोयाबीन खादयतेल व डबल फोर्टिफाईड मीठ वापरणे अनिवार्य राहील.

8.19 शासनाने निश्चित केलेल्या पाककृतीप्रमाणे व शाळेने ठरविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे तयार आहाराची वाहतूक ही हवाबंद डब्यातून व बंदिस्त वाहनातून संबंधित शाळेपर्यंत करावी लागेल.

8.20 पुरवठादार संस्थेमार्फत पुरवठा करण्यात आलेल्या आहाराची चव संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून किंवा इतर शिक्षक यांचेकडून घेण्यात येईल. त्यानंतर त्या आहाराचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येईल. आहार खाण्यात अयोग्य असल्यास तो स्विकारला जाणार नाही.

8.21 निकृष्ट दर्जाचा आहार पुरविल्यामुळे / उशिरा आहार पुरविल्यामुळे किंवा अन्य कारणास्तव पुरवठादार संस्थेस दंड आकारण्यात आल्यास, दंडाच्या रकमेची वसूली प्रथम त्यांच्या देयकामधून करण्यात येईल व दंडाची रक्कम देयकापेक्षा अधिक झाल्यास त्यांची वसूली सुरक्षा अनामत रकमेतून करण्यात येईल.

8.22 आहार पुरवठयाबाबत कोणतीही गैरघटना घडल्यास त्यास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील. तसेच संस्थेने पुरवठा केलेल्या आहारामुळे विषबाधेची घटना घडल्यास अन्न सुरक्षा व मानके अधिनियम 2006 अंतर्गत नियमानुसार संस्था कारवाईस पात्र ठरेल.

8.23 संस्था आहार पुरवठा करण्याचे काम करण्यात अथवा अटी शर्तीचे पालन करण्यात असमर्थ / अयशस्वी ठरल्यास त्यांचे काम कोणत्याही प्रकारची लेखी स्वरुपात पूर्वसूचना न देता रदद् करण्याचा अथवा त्या कामाकरिता अन्य पुरवठादार संस्था नियुक्त करण्याचा अधिकार संबंधित महानगरपालिका / नगरपालिका यांचा राहील.

8.24 स्वयंपाकगृहाचे स्थळ /ठिकाण अर्जामध्ये कळविल्याप्रमाणे त्याच ठिकाणी असणे आवश्यक आहे. गोडाऊन / स्वयंपाकगृह यांची तपासणी वेळोवेळी स्थानिक स्वराज्य संस्था / शासनामार्फत करण्यात येईल.

8.25 स्वयंपाकगृह व स्वयंपाकासाठी आवश्यक असणारा तांदूळ व धान्यादी माल ठेवण्याची जागा (कोठीघर /Store room/ Godown) स्वतंत्र असावी.

8.26 तांदूळ व धान्यादी माल ठेवण्याची जागा (कोठीघर /Store room/Godown)दररोजचे आहार पुरवठाविषयक कामकाज पूर्ण झाल्यांनतर, सीलबंद करणे अवश्यक आहे. तसेच शालेय पोषण आहार योजनेसाठी वापरलेला तांदूळ व धान्यादी माल यांच्या नोंदवहया दररोज अद्ययावत ठेवाव्यात.

8.27 पुरवठादार संस्थेमार्फत पुरवठा करण्यात आलेल्या आहारात तपासणीमध्ये प्रथिने व उष्मांक विहित परिमाणापेक्षा कमी आढळून आल्यास त्या दिवशी त्या संस्थेने पुरवठा केलेल्या सर्व शाळांतील आहाराची देयके अदा केली जाणार नाही. तथापि, सतत 3 वेळा पेक्षा जास्त वेळा आहारातील प्रथिने व उष्मांकाचे प्रमाण कमी आढळून आल्यास अशा पुरवठाधारकाचे काम

कोणतीही पूर्व सूचना न देता पूर्णपणे रद्द करण्याचे व पुरवठादार संस्थेला काळया यादीत टाकण्याचे अधिकार संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना राहील.

8.28 पुरवठा करण्यात आलेल्या आहारामुळे विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्यास , संबंधित पुरवठादारांविरुध्द योग्य ती फौजदारी कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे संस्थेने त्या दिवशी आहार पुरवठा केलेली सर्व शाळांतील सर्व विद्यार्थ्यांसाठीची देयके अदा करण्यात येणार नाहीत. विषबाधा झालेल्या तत्कालीन परिस्थितीचा विचार करुन पुरवठादारास सर्व वैद्यकीय खर्च करावा लागेल. जीवित हानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी पुरवठादारांची राहील. अशा संस्थेचे काम कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यात येईल.

8.29 ज्या पुरवठादार संस्थेमार्फत पुरविण्यात येणारा आहार ज्या दिवशी भेसळयुक्त असल्याचे आढळून आल्यास त्या दिवसाचा पुरवठा केलेल्या आहाराची देयके अदा करण्यात येणार नाहीत. आहारामध्ये भेसळ करणे ही बाब गांभीर्यपूर्वक विचारात घेऊन अन्न व भेसळ प्रतिबंध कायदयाखाली संस्था कारवाईस पात्र राहील.

तयार अन्न पुरविणा-या संस्थेला खालील नमूद कारणांकरिता त्या दिवसाचे देयक अदा न करण्याचा अधिकार संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस राहील.

1. विषबाधा झाल्यास
2. प्रयोग शाळा तपासणी अहवाला मध्ये नमुने असमाधानकारक आढळल्यास
3. धान्यामध्ये भेसळ आढळल्यास
4. धान्य निकृष्ट दर्जाचे आढळल्यास
5. आवश्यक प्रथिने व उष्मांक अन्नामध्ये न आढळल्यास

9. उपरोक्त नियमावलीतील अनुक्रमांक 5 मध्ये शासनाने प्रति युनिटसाठी किमान विद्यार्थी संख्या, त्यानुसार गोडाऊन व स्वयंपाकगृहासाठी आवश्यक जागा, आर्थिक उलाढाल इत्यादी बाबी निश्चित केल्या आहेत. सदर अटी व शर्ती यामध्ये स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन बदल करण्याचे अधिकार संबंधित स्वराज्य संस्थांच्या विभाग प्रमुखांना राहतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी
खडकी कटक मंडळ
( अमोल जगताप )

* * *

**खडकी कटक मंडळ**
**कार्यालय** :- **खडकी कटक मंडळ, खडकी , पुणे**
Email- ceokirkee@gmail.com
**दूरध्वनी क्रमांक** :- 020 -25810661

**तपशिलवार ई-निविदा सूचना** - 2019

**अटी व शर्ती मान्य असले बाबतचे निवेदन**

**कामाचे नाव** :- **शालेय पोषण आहार योजने अंतर्गत खडकी कटक मंडळ क्षेत्रातील (शासकीय व खाजगी अनुदानित शाळा ) शाळांमधील विद्यार्थ्यांना शिजवलेले अन्न पुरविणेबाबत.** .

सदर निविदेतील अटी व शर्ती मी / आम्ही वाचल्या असून आम्हांस त्या अटी व शर्ती मान्य व कबूल आहेत. त्यासाठी आम्ही स्वाक्षरी करीत आहोत. कोणतेही प्राधिकारणाने आमचे नाव काळया यादीत टाकलेले नाही किंवा आमचे फर्मवर बंदी घातलेली नाही. असे सत्य प्रतिज्ञेवर कथन करीत आहोत.

1. निविदाधारकाचे फर्मचे संपूर्ण नाव व पत्ता : ------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

2. बचतगट / स्वयंसेवी संस्था / संस्था अध्यक्षाचे नाव : -----------------------------------------
----------------------------------------

3. ज्या व्यक्तीशी संपर्क साधावयाचा आहे अशा माहितीगार इसमाचे नाव व फोन नंबर
------------------------------------------------------------------------------------------

4. बचतगट /स्वयंसेवी संस्था / संस्था कार्यालय पूर्ण पत्ता व फोन नंबर
--------------------------------------------------------------------------------------------

ठिकाण :- निविदाधारकाची सही व शिक्का
दिनांक :-

**टीप** :- सदर निविदेच्या अटी व शर्ती मान्य असलेबाबत सदर नमुन्यावर स्वाक्षरी करुन सदरचा नमुना (सदरचे पत्र ) तांत्रिक निविदे सोबत अपलोड करण/जोडणे आवश्यक आहे.